| MHNG180014702020 | – : कि.फौ.अ.क्र. ३१७/२०२० मधील कलम २३ (निशाणी ५) खालील अर्जावरील आदेश : |
|---|---|

१. सदरचा अर्ज अर्जदार क्र. १ मनिषा प्रमोद डाबरे यांनी गैरअर्जदार विरुध्द कौटुबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ (सदर कायदा) चे कलम २३ अन्वये तात्पुरते/ अंतरिम पोटगी व इतर आदेश मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदारचा क्र. १ चा विवाह हिंदु जाती रितीरिवाजाप्रमाणे दिनांक १४.०७.२०१२ रोजी मौजे कळमेश्वर येथे पार पडला होता. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारांकडे नांदायला गेली होती. तेथे इतर गैरअर्जदार सुध्दा एकत्रित कुटुंबात राहत होते. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांच्या लग्न संबंधातून त्यांना मुलगा अर्जदार क्र. २ प्रिहंस हा सुध्दा झाला.

३. लग्नाच्या काही दिवसानंतर अर्जदार क्र. १ च्या असे लक्षात आले की, गैरअर्जदार क्र. १ याला दारु पिण्याचे व्यसन आहे. तो दारुच्या नशेमध्ये नेहमी अर्जदार क्र. १ हिला मारहाण करित असे. त्याला असे करण्यासाठी गैरअर्जदार क्र. २ व ३ हे नेहमी चिथावीणी देत असायचे. लग्नाच्या अगोदर अर्जदार क्र. १ ही परिचारिकेचे काम करित होती. लग्नानंतर तिने काम करण्यासाठी गैरअर्जदार क्र. १ कडे परवानगी मागितली. परंतु, त्याने तिला काम करु दिले नाही. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे पाटील यांच्या घरी सुमारे दोन वर्ष भाडयाने राहत होते. त्यानंतर गोविंद बनते यांच्या घरी सुध्दा भाडयाने राहत होते. तेथे गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला शिवीगाळ व

मारहाण सुध्दा केली होती. त्यामुळे, ती पो.स्टे. हुडकेश्वर येथे तक्रार देण्यासाठी सुध्दा गेली होती. तेव्हा पोलिसांनी गैरअर्जदार क्र. १ ला बोलावून समज सुध्दा दिली होती. गैरअर्जदारांनी अर्जदारांच्या तब्येतीची कोणतीही काळजी कधीही घेतली नाही.

४. सन २०१९ मध्ये गैरअर्जदार क्र. १ चा अपघात झाला होता. त्यावेळी, अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ ला रुपये २०,०००/– तिच्या आईवडिलांकडून घेवून उपचारासाठी दिले होते. त्याआधी सुध्दा गैरअर्जदारांनी वारंवार अर्जदार क्र. १ कडे पैशाची मागणी केली. त्यांच्या दबावामध्ये अर्जदार क्र. १ ने वेळोवेळी अंदाजे रुपये दोन लाख ची रक्कम त्यांना दिली.

५. दिनांक २५.०१.२०२० रोजी गैरअर्जदार क्र.२ ने गैरअर्जदार क्र.१ ला बनते यांच्या घरातून सगळे सामान घेवून गैरअर्जदार क्र. ३ यांच्या घरी येण्यासाठी सांगितले होते. त्यामुळे ते सर्व गैरअर्जदार क्र. १ च्या घरी राहण्यासाठी आले. तेथे सर्व एकत्र राहत असताना सर्व गैरअर्जदार तिला शिवीगाळ तसेच मारहाण सुध्दा करत होते. त्यांची ती अमानुष वागणुक अर्जदार क्र. १ ने बरेच दिवस सहन केली. परंतु, तिला जिवीताची भिती वाटल्यानंतर तिने तिच्या आईवडिलांना संदेश पाठविला. त्यामुळे तिचे आईवडिल व नातेवाईक तिथे आले व त्यांनी गैरअर्जदारांना समज दिली. परंतु, तेव्हा गैरअर्जदारांनी त्यांचा अपमान केला. त्यांच्या समक्षच गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला काठीने मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे, दिनांक ०३.१०.२०२० पासून अर्जदार हे ब्राम्हणी येथे राहण्यासाठी आली. त्यानंतर सुध्दा गैरअर्जदारांनी विविध मार्गांचा अवलंब करुन अर्जदार क्र.१ व तिच्या माहेरच्या लोकांना वारंवार धमकावण्यावा प्रयत्न केला.

६. आज रोजी अर्जदार क्र. १ हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार क्र. १ चे आईवडिल यांची आर्थिक परिस्थिती सुध्दा चांगली नाही. या उलट, गैरअर्जदार क्र. १ ह्याच्याकडे स्वतःच्या गाड्या व ट्रक आहेत. गाडी क्र. एम.एच.४०/ए.के.७७९६ ही सुध्दा गैरअर्जदार क्र. १ च्या मालकीची गाडी आहे. या व्यतिरिक्त गैरअर्जदाराच्या मालकीची दहा हेकर ओलिताची शेती पांढुर्णा येथे आहे. त्या शेतीपासून त्याला वार्षिक रुपये दोन लाखाचे उत्पन्न होते. तसेच गाडीच्या व्यवसायातून सुध्दा गैरअर्जदार क्र. १ याला महिन्याला रु. ७०,०००/- मिळतात. त्यामुळे अर्जदार क्र. १ ने स्वतःसाठी प्रतिमाह रु. २०,०००/- व अर्जदार क्र. २ साठी प्रतिमाह रु. १०,०००/- एवढ्या पोटगीची तसेच संरक्षण आदेशाची मागणी केली आहे.

७. प्रकरणात गैरअर्जदार क्र. १ हजर झाले. परंतु, त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केला नाही. त्यामुळे, सदर अर्ज गैरअर्जदाराच्या लेखी जबाबाविना पुढे चालविण्यात आला. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जासोबत लग्नपत्रिकेची छायांकित प्रत व तिच्या विद्वान वकिलांमार्फत गैरअर्जदार क्र. १ यांना पाठविलेल्या नोटिसची प्रत पटलावर दाखल केलेली आहे. गैरअर्जदार क्र. १ ने जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे उभयपक्षातील नातेसंबंधाबाबत कोणतीही हरकत त्याने घेतलेली नाही. या व्यतिरिक्त लग्न पत्रिका यावरुन दिनांक १४.०६.२०12 रोजी अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह झाला होता या बाबीला पुष्टी मिळते. गैरअर्जदाराने लेखी जबाब दाखल केला नसल्यामुळे उभयपक्षातील नातेसंबंध व त्यांचे एकत्रित वास्तव्य असल्याचे सुध्दा दिसून येते. अर्जदाराने विस्तृतपणे तिला झालेल्या कौटुंबिक छळाच्या घटनांचा उल्लेख अर्जामध्ये केलेला आहे. तसेच, दिनांक २५.०२.२०२१ रोजी पो.स्टे. कळमेश्वर येथे दिलेल्या तक्रारीची छायांकित प्रत सुध्दा अर्जदार क्र. १ ने पटलावर दाखल केलेली आहे.

यावरुन गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ चा कौटुंबिक छळ केला हे प्रथमदर्शनी दिसून येते.

८. सदर अर्जामध्ये अर्जदार क्र. १ ने स्वतःसाठी व अर्जदार क्र. २ साठी एकत्रित रित्या रुपये ३०,०००/– च्या अंतरिम पोटगीची मागणी केली आहे. अर्जदाराचे विद्ववान वकिल श्री ठावरे यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदार क्र. १ ही आपल्या मुलाला घेवून तिच्या आईवडिलांकडे राहते. मागील काही दिवसांपासून अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार क्र. १ याला तिच्या घराच्या परिसरामध्ये फिरताना बघितले आहे. तो अर्जदार क्र. २ याला अर्जदार क्र. १ पासून जबरदस्तीने नेण्याचा प्रयत्नात आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिच्या मनात भिती निमाण झाली आहे. त्यामुळे तिला संरक्षण आदेशाची सुध्दा गरज आहे.

९. या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, अंतरिम पोटगी निश्चित करताना गैरअर्जदाराचे उत्पन्न, अर्जदाराच्या जगण्याचे राहनीमान व कौटुंबिक दर्जाही लक्षात घेणे गरजेचे आहे. अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ हा ट्रान्सपोर्ट चा व्यवसाय करतो. त्यापासून त्याला महिन्याला रु.७०,०००/– मिळतात असे म्हणणे मांडले आहे. परंतु, अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ च्या व्यवसाया बाबतीत कोणतेही दस्त व शेतीबाबतचे सात बारे दाखल केलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याला महिन्याला रु ७०,०००/– मिळतात याबाबतचा प्रथमदर्शनी पुरावा पटलावर उपलब्ध नाही. परंतु, हे एक कारण पोटगी नामंजूर करण्यासाठी पुरेसे नाही. गैरअर्जदार क्र. १ हा धडधाकट असून न्यायालयात हजर सुध्दा झालेला आहे. त्यामुळे तो काम करण्यास समक्ष आहे असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नक्कीच काढता येईल. आज रोजी अर्जदार क्र. १ व २ तिच्या वडिलांच्या घरी राहतात. ही बाब सुध्दा अंतरिम पोटगीच्या

आदेशामध्ये अडसर करणारी असु शकत नाही. अर्जदार सद्य स्थितीला कळमेश्वर येथे राहत असल्याचे दिसुन येते. ब्राम्हणी सारख्या ठिकाणचे जीवनमान बघता अर्जदार क्र. १ व २ यांना एकत्रित दरमहा रुपये ३,५००/– (रुपये तीन हजार पाचशे ) पुरेसे वाटतात. अर्जात नमूद तथ्यांच्या आधारावर अर्जदारांच्या पक्षामध्ये संरक्षण आदेश देणे सुध्दा आवश्यक वाटते. वरील चर्चेच्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | गैरअर्जदार क्र. १ याला असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदार क्र. १ व २ यांना एकत्रित अंतरिम पोटगी रक्कम रुपये ३,५००/– (रुपये तीन हजार पाचशे ) प्रतिमहा ही प्रस्तुत अर्जात दाखल दिनांक ११.१२.२०२० पासुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी. |
| ३. | पो. नि. पो.स्टे. कळमेश्वर यांना असे आदेशित करण्यात येते की, अर्जदार क्र. १ हिला जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा यशोचित संरक्षण द्यावे व मदत करावी. |
| ४. | संरक्षण अधिकारी कळमेश्वर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी सदर आदेशाच्या अंमलबजावणीसाठी सर्वोतपरी प्रयत्न करावे. |
| ५. | सदर आदेशाची प्रत पो.स्टे. कळमेश्वर, संरक्षण अधिकारी तसेच, दोन्ही पक्षास विनाशुल्क देण्यात यावी. |

**कळमेश्वर**
**दिनांक २६.०२.२०२१**

**(हर्षल ना. पोले)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**कळमेश्वर, जि. नागपुर**

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 25.02.2021 |
| Judgment dictated on | : | 26.02.2021 |
| Transcription Ready on | : | 26.02.2021 |
| Judgment checked and signed off | : | 26.02.2021 |

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे

लघुलेखकाचे नाव – आर.एम. परमाल (नि.श्रे.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Harshal Nanasaheb Pole
Date: 2021.02.26 16:21:53 +0530